जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. ॲड. कै. रुपाली पणदूरकर अभ्यासिकेचे कोनशिला अनावरणाने उद्घाटन प्रसंगी डॉ. रामचंद्र पणदूरकर, हेमकिरण पणदूरकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# रुपाली पणदूरकर अभ्यासिकेचे उद्घाटन

- पणदूरकर दांपत्यांनी दिलेल्या ६० लाख निधीतून शिवाजी विद्यापीठात इमारत साकारली

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (ॲड.) रामचंद्र पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी त्यांची एकमेव दिवंगत कन्या डॉ. (ॲड.) रुपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठास दोन टप्प्यांमध्ये ६० लाख रुपयांचा निधी दिला. त्या निधीमधून 'कमवा व शिका' योजना विद्यार्थिनींच्या वसतिगृह परिसरात अभ्यासिका इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीचे उद्घाटन हेमकिरण पणदूरकर यांच्या हस्ते कोनशिला अनावरण आणि फीत कापून करण्यात आले.

डॉ. पणदूरकर म्हणाले, येथील मुली अभ्यासिकेत अभ्यास करून मोठ्या होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, या अभ्यासिकेत ३०० विद्यार्थी अभ्यास करू शकतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षेत यश मिळविणाऱ्या राधिका जवळेचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार केला. इमारतीचे काम वेळेत करणारे महेश साळुंखे, रवी पाटील, संतोष शेखर आणि सुरेश जगताप यांचाही सत्कार केला. वसतिगृह अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपक भादले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थि होते.

18 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-शाहू-आंबेडकरांच्या प्रत्येक कृतीत शिव विचारांचा जागर

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे; शिवजयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रांतिसूर्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांचे हित, बहुजनांना शिक्षण, असे महत्त्वपूर्ण विचार कृतीतून अंमलात आणले. हाच खरा शिव विचारांचा जागर आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.



**कोल्हापूर : शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. व्यासपीठावर सुजित चव्हाण, राहुल इंगवले, के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, शिवाजीराव जाधव, लालासाहेब गायकवाड आदी. (छाया : मिलन मकानदार)**

श्री शिवाजी तरुण मंडळाच्या वतीने शिवजयंतीनिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज एक प्रेरणास्थान' या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष सुजित चव्हाण, कार्याध्यक्ष राहुल इंगवले, सचिव महेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिंदे यांनी व्याख्यानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगातून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. शिवाजी महाराज हे अठरापगड जाती-धर्माच्या लोकांच्या हृदयात होते म्हणून ते आपलेसे वाटतात.

शाहिस्तेखानावरील हल्ला, अफजलखानाचा वध या दोन गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आजचे जग ज्ञानाचे आहे, त्यामुळे तलवार, ढाल घेऊन लढाई जिंकता येणार नाही; तर आजच्या काळातील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शस्त्रास्त्राने लढावे लागणार आहे. यावेळी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, श्रीकांत भोसले, शिवाजीराव जाधव, लालासाहेब गायकवाड, अजित खराडे, एल. डी. खाडे आदी उपस्थित होते.

18 FEB 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांचे चरित्र वाचा, आचरणात आणा

## डॉ. व्ही. एन. शिंदे : शिवाजी तरुण मंडळातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र विकत घेऊन त्याचे वाचन करा. ते केवळ वाचू नका, तर आचरणात आणण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज येथे केले.

शिवाजी पेठेतील शिवाजी तरुण मंडळातर्फे आयोजित शिवजयंती उत्सवात ते 'छत्रपती शिवाजी महाराज एक प्रेरणास्थान', विषयावर बोलत होते. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसचे चेअरमन के. जी.



कोल्हापूर : शिवाजी पेठेत शिवजयंती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

पाटील अध्यक्षस्थानी होते. उभा मारुती चौकात त्याचे आयोजन केले होते. डॉ. शिंदे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य संघर्षमय होते. अनेक प्रसंगांना ते यशस्वीपणे सामोरे गेले. त्या-त्या प्रसंगात त्यांनी घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण होते. त्यामागे त्यांचे चिंतन होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्यासाठी आजच्या युवा पिढीने वाचनाला महत्त्व द्यायला हवे. विशेषतः छत्रपती शिवराय यांचे चरित्र वाचून प्रेरणा घ्यायला हवी.'

आग्र्याहून सुटका, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटे तोडल्याचे प्रसंग छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देतात. त्यांचे बुद्धी चातुर्य किती महत्त्वपूर्ण होते याचे दाखले देतात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी के. जी. पाटील, डॉ. शिंदे, न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील, प्रा. भरत खोराटे, सातारचे विभागीय अधीक्षक अश्विन वागळे यांचा सत्कार करण्यात आला. के. जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. व्याख्यान समितीचे अध्यक्ष भरत जाधव यांनी स्वागत केले. नियोजन समितीचे अध्यक्ष रवींद्र साळोखे यांनी प्रास्तविक केले. राहुल इंगवले यांनी आभार मानले. दरम्यान, सकाळी शिवाजी मंदिरातील आरोग्य शिबिराला प्रतिसाद मिळाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

तरुण भारत

# तरुणांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत

■ शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज की जय असं नुसतं म्हटल तरी माणसांच्या अंगात वेगळी शक्ती जागृत होते. त्यामुळे जनमाणसांनी विशेषतः तरुणाईने महाराजांचा जयजयकार करताना त्यांचे विचार आत्मसात करण्यावरही भर द्यावा. कोणत्याही कारणाने आपल्या दुःख झाले तर शिवरायांचे विचार डोळ्यासमोर घेऊन दुःखातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा. त्यांचे विचार माणसांमध्ये नवी प्रेरणा निर्माण करतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी तरुण मंडळाने शिवजयंतीनिमित्त उभा मारुती चौकात आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत हाते. छत्रपती शिवाजी महाराज एक प्रेरणास्थान असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानापूर्वी डॉ. शिंदे यांचा सत्कार केला. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के.जी. पाटील होते.

डॉ. शिंदे यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर विशेष टिपण्णी केली. ते म्हणाले, शिवाजी महाराजांनी आग्र्याहून करून घेतलेली सुटका हा त्यांच्याकडील बुद्धीचार्तुयाचे आणि कौशल्याचा परिपाक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याला अफझलखानाचा वध केल्यानंतर त्याची त्याच आत्मियतेने प्रतापगडाच्या पायथ्याशी कबर बांधतात. तेथे दिवाबत्तीची व्यवस्थाही करतात. यातून महाराजांकडील सहिष्णुता प्रकर्षाने दिसून येते. शिवाजी



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

महाराजांनी शाहिस्तेखानाची बोटे छाटली हे आपणाला सर्वांना माहिती आहे. परंतू महाराजांचा हा सर्जिकल स्ट्राईक होता. भारतातील हा पहिला सर्जिकल स्ट्राईक म्हणावा लागेल. शिवाजी महाराज संकटात असताना अगदी वैचारिक निर्णय घेत होते.

तानाजी मालुसरे यांनी प्राणाची आहुती देऊन स्वराज्यात कोंढाणा किल्ला आणला. त्याची जाणिव ठेवत शिवाजी महाराजांनी कोंढाणाला किल्ल्याला सिंहगड नाव देऊन तानाजी मालुसरे यांचे नाव इतिहासात अमर केले. या बहुआयामी शिवाजी महाराजांचे चरित्र देशातील प्रत्येकाने अंगी बाणवले पाहिजे. त्यांच्या विचारांनुसार जीवन जगण्याला प्राधान्य दिले गेले तर खऱ्या अर्थाने आपण सर्वजण शिवाजी महाराजाचे पाईक बनल्याचा अभिमान वाटेल, असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025
तरुण भारत

# शिवजयंतीनिमित्त विद्यापीठात आज विविध कार्यक्रम

शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी,विद्यार्थी विकास
**कोल्हापूर :** शिवाजी महाराज जयंतीनिमित्त व्याख्यानासह पोवाडा
विभाग यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त व्याख्यानासह पोवाडा
आणि मर्दानी खेळांचेही आयोजन केले आहे. आज (दि. १८) दुपारी १२.३०
वाजता राहूल नलावडे यांचे व्याख्यान होणार आहे. सायंकाळी ५ वाजता शाहिर
डॉ. अमोल रणदिवे यांच्या 'शाहिरी पोवाडा व मर्दानी खेळाचे सादरीकरण
होणार आहे. बुधवार १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजता मर्दानी खेळ,
शिवरायांच्या प्रतिमेला मानवंदना, सायंकाळी ७ वाजता दीपोत्सव होणार आहे.

18 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठामध्ये आज व्याख्यान, शाहिरी पोवाडा, मर्दानी खेळांचे आयोजन

कोल्हापूर:पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी व संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. १८) व्याख्यानासह पोवाडा, मर्दानी खेळांचेही आयोजन केले आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवजन्मोत्सव सोहळा २०२५' अंतर्गत दि. १८ रोजी दु. १२.३० वा. 'कणखर नेतृत्वासाठी शिवनीती' या विषयावर शिवचरित्र अभ्यासक राहुल नलावडे यांचे प्रबोधनपर उद्‌बोधक व्याख्यान होणार



आहे. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सायं. ५ वा. युवाशाहीर डॉ. अमोल रणदिवे यांच्या शाहिरी पोवाड्याचा कार्यक्रम, मर्दानी खेळाचे सादरीकरण महाराष्ट्र संस्कृती शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रम होणार आहे. दि. १९ रोजी स. ७.३० वा. मर्दानी खेळ, शिवरायांच्या प्रतिमेला मानवंदना कार्यक्रम, तर सायं. ७ वा. दीपोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. एम. व्ही. गुळवणी यांच्यासह विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तुकाराम चौगुले, मुलांच्या वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक डॉ. प्रल्हाद माने, मुलींच्या वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, कमवा व शिका वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक डॉ. दीपक भादले उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात आजपासून 'शिवजन्मोत्सव सोहळा' होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी व संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थी विकास विभागतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उद्या, मंगळवारपासून व्याख्यानासह पोवाडा, मर्दानी खेळांचेही आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवजन्मोत्सव सोहळा' अंतर्गत मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता 'कणखर नेतृत्वासाठी शिवनीती' या विषयावर शिवचरित्र अभ्यासक राहुल नलावडे यांचे व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सायंकाळी पाच वाजता युवाशाहीर डॉ. अमोल रणदिवे यांच्या शाहिरी पोवाड्याचा कार्यक्रम, मर्दानी खेळाचे सादरीकरण होईल. बुधवारी (ता. १९) सकाळी साडेसात वाजता मर्दानी खेळ, शिवरायांच्या प्रतिमेला मानवंदना कार्यक्रम, तर सायंकाळी सात वाजता दीपोत्सव होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून 'इन्फोसिस'चा कॅम्पस ड्राईव्ह

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज (दि. १८) पासून इन्फोसिस कंपनीच्या वतीने दोनदिवसीय कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे संचालक डॉ. राजन पडवळ यांनी माहिती दिली. इन्फोसिसच्या या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी ऑनलाईन पद्धतीने सुमारे २२०० उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अभियांत्रिकी पदवीधरांसह गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विषयांत एम.एस्सी. आणि एमसीए झालेल्या उमेदवारांचा यात समावेश आहे. यापैकी सुमारे १२०० जणांनी पुढील फेरीसाठी निवड केली आहे. या निवडलेल्या उमेदवारांसाठी आज सकाळी ९ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्लेसमेंटपूर्व मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे. इन्फोसिसचे वरिष्ठ अधिकारी उमेदवारांना मार्गदर्शन करतील. त्यानंतर दिवसभरात दोन बॅचेसमध्ये उमेदवारांच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतील. तंत्रज्ञान अधिविभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि आय.जी.टी.आर. कक्ष (भूगोल अधिविभाग) येथे या परीक्षा होतील. या चाळणी परीक्षेत यशस्वी झालेल्या निवडक उमेदवारांच्या बुधवारी (दि. १९) प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात आजपासून 'इन्फोसिस'चा कॅम्पस ड्राइव्ह

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उद्या, मंगळवारपासून इन्फोसिस कंपनीतर्फे दोनदिवसीय कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह होणार आहे. त्यासाठी सुमारे २२०० उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अभियांत्रिकी पदवीधरांसह गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विषयांत एमएस्सी आणि एमसीए झालेल्या उमेदवारांचा यात समावेश आहे. यापैकी सुमारे १२०० जणांनी पुढील फेरीसाठी निवड केली आहे. या निवडलेल्या उमेदवारांसाठी मंगळवारी सकाळी नऊ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्लेसमेंटपूर्व मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे. दिवसभरात दोन बॅचेसमध्ये उमेदवारांच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतील. तंत्रज्ञान अधिविभाग, संख्याशास्त्र अधिविभाग, आयजीटीआर कक्ष (भूगोल अधिविभाग) येथे या परीक्षा होतील. या चाळणी परीक्षेत यशस्वी झालेल्या निवडक उमेदवारांच्या बुधवारी (ता. १९) प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येतील, अशी माहिती विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे संचालक डॉ. राजन पडवळ यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

पुढारी

# विद्यापीठात आजपासून 'इन्फोसिस'चा कॅम्पस

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात मंगळवार (दि. १८) पासून इन्फोसिस कंपनीच्या वतीने दोनदिवसीय कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे संचालक डॉ. राजन पडवळ यांनी माहिती दिली.

इन्फोसिसच्या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी ऑनलाईन पद्धतीने सुमारे २२०० उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अभियांत्रिकी पदवीधरांसह गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विषयांत एम.एस्सी. आणि एमसीए झालेल्या उमेदवारांचा यात समावेश आहे. यापैकी सुमारे १२०० जणांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या उमेदवारांसाठी मंगळवारी सकाळी ९ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्लेसमेंटपूर्व मार्गदर्शनचे आयोजन केले आहे. यावेळी इन्फोसिसचे वरिष्ठ अधिकारी उमेदवारांना मार्गदर्शन करतील. त्यानंतर दिवसभरात दोन बॅचेसमध्ये उमेदवारांच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतील. तंत्रज्ञान अधिविभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि आय.जी.टी.आर. कक्ष भूगोल अधिविभाग येथे परीक्षा होतील. या चाळणी परीक्षेत यशस्वी झालेल्या निवडक उमेदवारांच्या बुधवारी (दि. १९) प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025
पुढारी

# विद्यापीठाकडून ७०३ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर पार पडलेल्या ७०३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

पुढारी

# संत सेवालाल महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर : संत सेवालाल महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी, समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रतिभा देसाई, संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. एस. व्ही. राजगुरू, उपकुलसचिव निवास माने, डॉ. मयुरेश पाटील, आकाश ब्राह्मणे, विवेक गनबावले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

पुढारी

# रेडिओत मनोरंजनासोबत विश्वासार्हता जपा

## आरजे झाहिद; रेडिओ दिनानिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



रेडिओ हे कायम टिकून राहणारे माध्यम आहे. रेडिओत काम करताना मनोरंजनाबरोबरच विश्वासार्हता जपली पाहिजे, असे आवाहन आरजे झाहिद यांनी केले. शिवाजी विद्यापीठ एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात रेडिओ दिनानिमित्त 'रेडिओची बोली' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

आरजे झाहिद म्हणाले, रेडिओवर बोलताना आपला आवाज, उच्चार महत्त्वाचा असतो. यासाठी तुमचा आवाज जोपासण्याची गरज आहे. श्वासाचा व्यायाम करा, तुमच्या कल्पनाशक्तीला वाव द्या. रेडिओत काम करताना ऐकणाऱ्याच्या मनात शिरण्याची कला अवगत करा. खासगी रेडिओ चॅनल हे विविध वयोगटातील श्रोत्यांचं मनोरंजन करण्याचे काम करतात. परंतु, कोणत्याही माध्यमातून मनोरंजनाबरोबरच आपल्या संस्कृतीचं प्रतिबिंब उमटणे आवश्यक आहे.

डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविकात शिववाणी रेडिओ चॅनलच्या वतीने घेण्यात येत असलेले उपक्रम व कार्यक्रमांबाबत माहिती दिली. कल्याणी अमणगी यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांची ओळख अभिषेक पाटील यांनी करून दिली. रोहित भारतीय यांनी आभार मानले. यावेळी शिववाणी रेडिओचे कार्यक्रम निर्माता अभिषेक पाटील, श्रोत्यांचे प्रतिनिधी मतीन शेख, कल्याणी अमणगी, माहिती अधिकारी वृषाली पाटील, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. उदय पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आदी होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025
पुढारी

# अभिनय ही करून पाहण्याची गोष्ट

## डॉ. भुताडिया; संगीत व नाट्यशास्त्र विभागात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अभिनय ही करून पाहण्याची गोष्ट आहे, असे मत अभिनेते डॉ. शरद भुताडिया यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. भुताडिया यांच्या वास्तवदर्शी अभिनय या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यशाळेमध्ये ३० प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ. भुताडिया यांनी वास्तवदर्शी अभिनय म्हणजे नेमकं काय? तो आत्मसात कसा करावा? तसेच अनुभव, सराव, इमोशनल बँक, कृतीचा कार्यकारण भाव ओळखून व त्याचा वापर करून वास्तवदर्शी अभिनयाचे पैलू कसे उलगडायचे, हे प्रात्यक्षिकासह सादर केले. विभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकुर-देसाई यांनी स्वागत केले. किरणसिंह चव्हाण यांनी आभार मानले. कार्यशाळेचे व्यवस्थापन मल्हार जोशी व अतुल परीट यांनी केले. यावेळी डॉ. संजय तोडकर, रवीदर्शन कुलकर्णी, राज पाटील, विकास कांबळे, युवराज केळुसकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

तरुण भारत

# आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. कराडे फिलिपाईन्सला रवाना



**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय मानसशास्त्र कॉंग्रेसच्या वतीने २१ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत फिलिपाईन्स येथे आयोजित परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. जगन कराडे रवाना झाले आहेत. फिलिपाईन्स ग्लोबल सिटीमधील नॅशनल युनिव्हर्सिटी, क्लर्क येथे 'दि इव्हॉल्व्हिंग लँडस्केप ऑफ मेंटल हेल्थ: ग्लोबल अनोव्हेशन्स इन असेसमेंट, ट्रीटमेंट अँड ट्रेन्ड्स' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. 'जागतिक मानसिक आरोग्य' या विषयावरील परिसंवादात 'मानसिक आरोग्य आणि सामाजिक असमानता' या विषयावर डॉ. कराडे मार्गदर्शन करणार आहेत. त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर १५ संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ लंडनच्या केंब्रिज पब्लिकेशन्सकडून प्रकाशित झाले आहेत. त्यांनी यापूर्वी व्हिएन्ना (ऑस्ट्रिया), टोरँटो (कॅनडा), तैपेई (तैवान), मलेशिया आणि दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही सहभाग नोंदवला होता. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटीचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले असून राज्य पातळीवरील मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघाची निवड

**मुरगूड :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आयोजित २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडामहोत्सव स्पर्धा चंद्रपूर येथील शिवाजी महाराज विद्यापीठात होत आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या १२ खेळाडूंची निवड झाली असून हा संघ या स्पर्धेत सहभागी होत असल्याची माहिती निवड समिती चेअरमन प्रा. सुनील चव्हाण यांनी दिली आहे. संघात ओंकार लोकरे , गजानन गोथडे, कृपेश पाटील, अमन नायकवडी, हर्षद कांदळकर, अभिजीत कांबळे, गिरीश खामकर, धीरज पाटील, धैर्यशील खोत, पियुष जांभळे, देवेंद्र कोळगे, सौरभ गदाळे यांचा समावेश आहे. निवड समितीचे चेअरमन प्रा. सुनील चव्हाण , प्रा. संदीप पाटील व प्रा. एन. डी. पाटील ( बिद्री ) यांच्या समितीने केली आहे.

18 FEB 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, प्रकाश फाउंडेशन विजयी

## वरुटे, भोई चमकले : मंगलमूर्ती, प्रकाश फाउंडेशनचा पराभव

### मेजर यादव चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १७ : केडीसीए आयोजित मेजर यादव चषक 'क' गट टी-२० क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने मंगलमूर्ती क्रिकेट अकादमी 'ड' संघाचा, तर प्रकाश फाउंडेशन 'अ'ने श्री क्रिकेट स्पोर्टस् असोसिएशनचा पराभव केला.

शासकीय तंत्रनिकेतनच्या मैदानात पहिला सामना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व मंगलमूर्ती क्रिकेट अकादमी संघात रंगला. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ९ बाद १६२ धावा केल्या. यामध्ये विश्वनाथ वरुटेने ८०, विक्रम कोंढावळेने २६, अजय आयरेकरने नाबाद १५ धावा केल्या. मंगलमूर्ती अकादमीकडून दीपक बावचे व माणिक जाधव यांनी प्रत्येकी तीन, तर अर्शद पटवेगार, प्रथमेश धारव यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. उत्तरादाखल खेळताना मंगलमूर्ती संघाला हे आव्हान पेलवले नाही. त्यांचा सर्व संघ १८ षटके १ चेंडूत सर्वबाद ९८ धावांत गुंडाळला. यात केवळ शुभम घुमकेलाच दुहेरी १५ धावसंख्या गाठता आली. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाकडून गोलंदाजी करताना अनिल पाटीलने तीन, राज मंडपे, सुरेश वाघवेकर यांनी प्रत्येकी दोन गडी, तर अजय आयरेकर, शशिकांत दाभाडे, विशांत भोसले यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. हा सामना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने ६४ धावांनी जिंकला.

दुसऱ्या सामन्यात प्रकाश फाउंडेशन 'अ'ने श्री क्रिकेट स्पोर्टस् असोसिएशन 'अ'चा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्री क्रिकेट स्पोर्टस् असोसिएशनने १९ षटके ४ चेंडूंत ८ बाद १२० धावांचे आव्हान प्रकाश फाउंडेशन संघापुढे ठेवले. यात सुनील पाटीलने नाबाद २०, भगवान कुंभारने १७, युवराज बाबरने १३, आदित्य पाटीलने १२, शेखर जाधवने ११ धावा केल्या. गोलंदाजी करताना प्रकाश फाउंडेशनकडून ओम अणुसेने तीन, शार्दुल वांदेने दोन, आदनान मलिक, साहिल केसरकर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. उत्तरादाखल खेळताना प्रकाश फाउंडेशनने हा सामना ११ षटके ५ चेंडूंत ३ गड्यांच्या मोबदल्यात १२४ धावा करीत जिंकला. यात इंद्रजित भोईने नाबाद ५३, ओम अणुसे २५, प्रतीक लव्हटेने नाबाद १८ धावा केल्या. श्री क्रिकेट संघाकडून विवेक काशीद, वेदांत कदम यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.